## थोडक्यात...

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या प्रांत लिगल सेल प्रमुखपदी ॲड संजय केकाण यांची निवड



**परभणी** – अखिल भारतीय ग्राहक पंचायत देवगिरी प्रांत लिगल सेल(विधी आघाडी)प्रमुखपदी परभणीचे ॲड संजय केकाण यांची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथे सोमवार दि. ९ जून २०२५ रोजी देवगिरी प्रांत कार्यकारिणीच्या बैठकीत देवगिरी प्रांत अध्यक्ष डॉ विलास मोरे यांनी ॲड संजय केकाण यांची निवड जाहीर केली आहे. यावेळी पश्चिम क्षेत्रीय संघटन मंत्री नितीन काकडे, प्रांत संघटन मंत्री रामदास ठोंबरे, प्रांत सचिव ओंकार जोशी प्रा. डॉ. स्मिता अवचार, धनंजय मुळे, एड. संगमेश्वर रासुरे, ॲड. संगीता धुमाळ, रवींद्र पिंगळीकर, मंजुश्री ढेपे, प्राचार्या डॉ संगीता आवचार, किरण बोचरे, दामोदर पारेख, ॲड दत्तात्रय पाटील, राजेश मेहता यांच्यासह देवगिरी प्रांत पदाधिकारी उपस्थित होते. निवड झाल्याबद्दल ॲड संजय केकाण यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### दहा महिलांना सरकी लागवड यंत्र वाटप



(संतोष तायडे/दै.धर्मयोध्दा)

**बोरी** - जिंतूर तालुक्यातील बोरी येथे अंकुर कंपणीला ५० वर्ष पूर्ण झाल्याने महीलांचा केला सन्मान शेतकरी संघटना युवा आघाडीचे अध्यक्ष सतिश दानी यांच्या हस्ते केले वाटप अंकुर कंपणीला ५० वर्ष पूर्ण झाल्याने कंपणीने दहा जिल्यामधे प्रतेकी दहा यंत्र महीलांना वाटप करुन महीला सन्मान करत आमृत महोत्सव साजरा करत आहे त्या निमित्त परभणी व हींगोली या दोन जिल्ह्याचे यंत्र वाटपाचा कार्यक्रम हानुमान मंदिर सभागृह बारशीव येथे दि. ३१/५/२५ रोजी दुपारी ४ वाजता संपन्न झाला या वेळी सतीष दानी, अंकुर कंपणीचे शास्त्रज्ञ डॉ समिर, बोरकर,गजानन देशमुख मारवाडीकर जिल्हाध्यक्ष शेतकरी संघटना परभणी ,हिंगोली जिल्हाध्यक्ष देविप्रसाद ढोबळे यांनी मनोगत व्यक्त केले उत्तमराव वाबळे, प्रल्हाद राखोंडे माधवराव शिंदे, गनेशराव पवार, माधव खरात,हे उपस्थित होते गिरी यांनी सुत्र संचालन केले कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करन्यासाठी प्रयत्न केले.




**पाथरी** – तालुक्यातील पोहे टाकळी येथे एक दिवस गावकऱ्यांसाठी कार्यक्रमा मध्ये आरोग्य बाबतीत माहिती देताना डॉ सुरवसे साहेब व गावकरी दिसत आहेत. (छाया–मुरलीधर गोंगे)



**परतुर**- येथील जिल्हा परिषद हायस्कूल येथे सुरू असलेल्या वरीष्ठ वेतन श्रेणी शिक्षक प्रशिक्षणा दरम्यान कर्तव्यदक्ष महिला शिक्षकांनी प्रशालेच्या प्रांगणात असलेल्या वडाच्या झाडाची पूजा करून वटपौर्णिमा साजरी केली. यामध्ये सौ. वरकड, सौ.काळे,सौ.पोल्हे,सौ.झंजे,सौ.डुकरे,सौ.क्षीरसागर, सौ.गवई, सौ.उबाळे इत्यादी महिलांनी सहभाग घेतला. (छाया- विजय राठोड)

# राज्य सरकारला क्या हुआ तेरा वादा सवाल करत उबाठाचा तहसीलवर ट्रॅक्टर व बैलगाडी मोर्चा





(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली** – हिंगोली मागील विधानसभा निवडणुकीच्या प्रसंगी शेतकऱ्यांना विविध प्रलोभन दाखवीत हे तिघाडी सरकार सत्तेवर आले असून त्यांनी निवडणुकीत जाहीर केलेल्या कुठल्याही शेतकरी योजना व इतर वचन पूर्ण न केल्याने उबाठा गटाकडून राज्य सरकारचा निषेध करत क्या हुआ तेरा वादा असा सवाल करून थेट सेनगाव तहसील कार्यालयावर ट्रॅक्टर व बैलगाडी निषेध मोर्चा आज दि .११ जून सकाळ अकरा वाजण्याच्या सुमारास धडकला. महाराष्ट्रात आलेलं हे त्रिफळे सरकार असून या सरकारने निवडणूक दरम्यान शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन व विकासासाठी आम्ही कार्य करू असे वचन देऊन ते कुठलेही न पाळल्याने उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांच्या नेतृत्वात क्या हुआ तेरा वादा असा सवाल करत आज राज्य सरकारच्या निषेध करण्यासाठी बैलगाडी व ट्रॅक्टर मोर्चा चे आयोजन तहसील कार्यालयावर करण्यात आले होते यावेळी मोठ्या प्रमाणात शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांनी आपल्या भाषणात या त्रिफळी सरकारचा आम्ही निषेध करत असून या शासनाने वेळीच आमच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास आम्ही येणाऱ्या काळात शिवसेना स्टाईल आंदोलन करणार असून यावेळेस मात्र अशा काम चुकार सरकारला पळता भुई थोडी होईल असा इशारा जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांनी दिला तर तहसीलदार महोदय यांनी तालुक्यात होत असलेला भ्रष्टाचारावर वेळीच अंकुश लावणे गरजेचे असून पंचायत समितीमध्ये गोरगरीब लाभार्थ्यांची होणारी आर्थिक लूट ही चिंतेची बाब असून घरकुल योजनेमध्ये धनादेश काढण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांकडून दहा ते बारा हजार रुपये व गुरांच्या कोटासाठी दहा हजार रुपये संबंधित विभाग प्रमुख घेत असल्याचा आरोपही देशमुख यांनी केला हा गंभीर प्रकार तात्काळ बंद करा अन्यथा आम्ही शिवसैनिक आहोत हे लक्षात ठेवावे असा गर्भित इशारा संबंधित यंत्रणा दिला आहे तसेच शिवसेना जिल्हा समन्वयक दिनकरराव देशमुख यांनी जेव्हा शेतकऱ्यावर अन्याय अत्याचार होतो तो न्यायाच्या प्रतीक्षेत असतो त्यावेळी त्यासमोर फक्त आणि फक्त बाळासाहेब ठाकरेची शिवसेना उभी टाकते त्यामुळे संबंध जिल्ह्यातील शेतकरी बांधवांवर कुठलाही अन्य अत्याचार असो किंवा आर्थिक लूट असो अशा गंभीर बाबी साठी सदैव बाळासाहेब ठाकरे शिवसेना सोबत असेल असे अभिवचन शिवसेना जिल्हा समन्वयक दिनकरराव देशमुख यांनी दिले व राज्य सरकारकडून दिलेल्या भूलथापा या भुलव्या व फसव्या असल्याचा आरोप देखील देशमुख यांनी केला आहे. या बैलगाडी व ट्रॅक्टर मोर्चा मोठ्या प्रमाणात तालुक्यातील शेतकरी बांधव आपली बैलगाडी व ट्रॅक्टर घेऊन सामील झाले होते या मोर्चाचे नेतृत्व जिल्हाप्रमुख संदेश देशमुख जिल्हा समन्वयक दिनकरराव देशमुख जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर मांडगे तालुकाप्रमुख संतोष देवकर तालुका उपप्रमुख पिंटू गुजर युवा सेना तालुकाप्रमुख जगदीश गाढवे यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती विविध मागण्याचे निवेदन सेनगाव नायब तहसीलदार देवराव कारगुडे व अवलकारकून विनोद अंभोरे यांच्याकडे देण्यात आले या मोर्चादरम्यान बंदोबस्त कामी सपोनी दीपक मस्के यांनी चोक बंदोबस्त ठेवण्यात आला होता पोलीस उपनिरीक्षक मारोती सोनकांबळे, शहर बीट अंमलदार सुभाष चव्हाण, जाधव, गायकवाड यासह पोलीस कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आले होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार विहार समितीच्या वतीने भदंत डॉ. उपगुप्त यांनी स्वीकारला

(शेख असद/दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा** - येथील बोधिसत्व डॉक्टर बी आर आंबेडकर स्मारक व बुद्ध विहार समिती पूर्णा यांना यावर्षीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष डॉ. उपगुप्त महाथेरो सचिव एडवोकेट महेंद्र गायकवाड यांनी दि.१० जून २०२५ यशवंतराव सभागृह मुंबई येथे माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या या कार्यक्रमात समारंभ पूर्वक स्वीकारला. एक लाखाचा धनादेश प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्हे अशी पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सामाजिक न्याय मंत्री संजय




शिरसाठ मंत्री, भारत गोगावले सामाजिक न्याय विभागाचे मुख्य सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा सन्मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष डॉ.भीमराव आंबेडकर पी.इ. एस. सोसायटीचे अध्यक्ष म हाऊपासक एस.पी.गायकवाड माजी सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले आदींनी फोन द्वारे अभिनंदन केले आहे.

## ३० वर्षीय विवाहितेवर ४ नराधमांनी केला अत्याचार धनगर टाकळी येथील घटना–चौघा सोबत एका महीलेचाही समावेश

(असद शेख / दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा**- एका ३० वर्षीय विवाहितेवर चार जणांकडून अत्याचार करण्यात आल्याची घटना तालुक्यातील धनगर टाकळी येथे घडल्याचे उघडकीस आले असून, घटनेतील ईसमांना मदत करण्यासाठी एका महीलेचाही सहभाग असल्याची माहिती समोर आली आहे.याप्रकरणी चुडावा पोलीसांत महीलेसह चार अज्ञात नराधमांविरुद्ध गुरनं १२५/२०२५,कलम ७०,११८(१),१२७(४) भा.न्या.सं कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी



की,पूर्णा तालुक्यातील मौजे धनगर टाकळीत राहणाऱ्या एका ३० वर्षीय महीलेची परिसरात एका ग्रामस्थांचे बांधकाम करणाऱ्या अज्ञात मिस्त्री व एका महीलेसह४ मजुरांसोबत औटघटीकेची ओळख झाली होती.सदरील ओळखीचा फायदा घेऊन यातील ४ जणं तीच्यावर डोळा ठेवून होते.संधी साधत ५ जणांनी संगणमत करून पिडीतेस गोड बोलून तीला नांदेड व त्यानंतर कोणत्यातरी अज्ञात खेडगावातील शेतात नेऊन तिचे हात पाय बांधुन तिच्या संमतीविना तीच्या वर जबरदस्तीनेचार अज्ञातांकडून आळीपाळीने बलात्कार करण्यात आला. सदरील गोष्ट कुणाला सांगु नये म्हणून मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. घाबरलेल्या महीलेने सदरीलप्रकार कुटुंबीयांनाकळवला.या नंतर कुटुंबीयांनी चुडावा पोलीस ठाणे गाठून सर्व प्रकार पोलीसांना सांगितला या प्रकरणी चुडावा पोलीस ठाण्यात पिडीतेच्या फिर्यादीवरून एका बांधकाम मिस्त्री तसेच १ महीला व ४ मंजुर अशा पाच जणांविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनास्थळी जिल्हा पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी,अप्पर पोलीस अधिक्षक यशवंत काळे यांच्यासह उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ समाधान पाटील, ठाणेदार नरसिंग पोमनाळकर यांनी पिडीतेची भेट घेतली आहे.तपास सपोनि नरसिंग पोमनाळकर हे करत आहेत.

## ज्ञानसाधना प्रतिष्ठान व सावित्री मंच परभणीच्या वतीने ४०० महिलांना वृक्ष वाटप करून संस्कृती व पर्यावरण संवर्धन करून वटपौर्णिमा साजरी





**परभणी** - ज्ञानसाधना प्रतिष्ठान व सावित्री मंच यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानसाधना प्रतिष्ठान मध्ये संस्कृती सोबतच पर्यावरणाचे संवर्धन करण्यात आले . ज्ञानसाधना प्रतिष्ठानच्या वतीने आपल्या उज्वल भविष्यासाठी एक झाड लावावे या उदात्त हेतूने सावित्री मंच च्या अध्यक्षा तथा ज्ञानसाधना प्रतिष्ठान च्या सचिव सौ. शीतल किरण सोनटक्के यांनी ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे!''या तुकारामांच्या अभंगाला आदर्श मानून आज वटपोर्णिमा सणाचे औचित्य साधून ४०० महिलांना वृक्ष वाटप करून अनोख्या पद्धतीने या व्रताची सांगता केली. सावित्री मंच नेहमीच महिलांच्या सबलीकरण व सक्षम ीकरणासाठी विविध उपक्रम घेत असते. निसर्ग हाच गुरु ...!!या विचाराने प्रेरित अशा अनोख्या उपक्रमातून संस्कृती व पर्यावरणाचा समतोल साधला. विशेष बाब म्हणजे सध्या ज्ञानसाधना प्रतिष्ठान मध्ये सुरू असलेल्या वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणातील सुमारे अडीचशे महिला प्रशिक्षणार्थींची या कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभली .या सर्व महिला प्रशिक्षणार्थींना वृक्ष वाटप करण्यात आले. यामध्ये आंबा ,कडुलिंब,चिंच, वड ,पेरू, सिताफळ,चिकू, जांभूळ, बदाम इत्यादी पारंपारिक वृक्ष व फळझाडांचे वाटप करण्यात आले. तसेच ,या सर्व महिलांनी एकत्र मिळून ज्ञानसाधना प्रतिष्ठान मधील ऑक्सिजन पार्क मध्ये वटवृक्षाची पूजा करून उत्साह पूर्ण वातावरणात हा सण साजरा केला. याप्रसंगी सर्व महिलांनी वृक्ष संगोपन करण्याची सामूहिक शपथ घेतली. संस्था सचिव सौ.शीतल सोनटक्के यांनी आपल्या मनोगतातून वृक्षारोपण करून पर्यावरणाचे संवर्धन करण्याचा संदेश दिला . हजारों वर्षांची संस्कृती लाभलेल्या भारत देशामध्ये आपण जन्माला आलो याचा सार्थ अभिमान व्यक्त केला. यानंतरही हजारो वर्षांची संस्कृती व पर्यावरणाचे संवर्धन ,संक्रमण व संरक्षण व्हावे... हा मोलाचा संदेश दिला.या कार्यक्रमासाठी ज्ञानसाधना प्रतिष्ठान मधील सर्व समन्वयक ,विभाग प्रमुख, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे योगदान लाभले. हा कार्यक्रम अत्यंत उत्साह पूर्ण व आनंदात साजरा झाला.

# आमदार लोणीकरांचा पाठपुरावा यशस्वी अतिवृष्टी अनुदान वाटपात ७५ कोटीचा घोटाळा झाल्याचे उघड

(विवेक भुतेकर /दै.धर्मयोध्दा)

**जालना** - जिल्ह्यात अतिवृष्टी, वादळ आणि गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी मंजूर झालेल्या अनुदान वाटपात ७५ कोटी रुपयांचा मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा भ्रष्टाचार उजेडात आला. अंबड आणि घनसावंगी तालुक्यांतील अंतिम चौकशी अहवालात २५ तलाठी दोषी आढळले असून, तहसीलदार, नायब तहसीलदार, लिपिक आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू आहे. प्राथमिक अंदाजानुसार, एकूण अपहाराची रक्कम ८९ कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. या घोटाळ्याने शेतकऱ्यांच्या हक्काचा निधी लुटला गेला असून, प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचाराचा क्रूर चेहरा समोर आला आहे.



**घोटाळ्याचा तपशील**– जालना जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफ्राबाद तालुक्यांमध्ये १२,००० बोगस शेतकऱ्यांच्या नावाने अनुदानाची लूट झाल्याचे उघड झाले आहे. चौकशीत खालील गंभीर प्रकार समोर आले: - *बनावट नावांचा समावेश:* बीड, अहिल्यानगर आणि बुलढाणा जिल्ह्यांतील व्यक्तींची नावे, ज्यांचा जालना जिल्ह्याशी संबंध नाही, यादीत घुसवली गेली. - *तलाठ्यांचा गैरप्रकार:* तलाठ्यांनी तहसीलदारांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरून बोगस नावे अपलोड केली. - *बनावट अहवाल:* संयुक्त पाहणी न करता बनावट अहवाल सादर करून डीबीटी (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) द्वारे बोगस खात्यांमध्ये पैसे वळवले गेले. - *अपहाराची रक्कम:* अंबड तालुक्यात १५.९३ कोटी आणि घनसावंगी तालुक्यात १९.०३ कोटी, अशा एकूण ३४.९७ कोटींचा अपहार उघड झाला. - *प्रकारनिहाय गैरव्यवहार:* - *८-अ यादीत नाव नसणे:* अंबड तालुक्यात १४.१३ कोटी, घनसावंगी तालुक्यात ९.५६ कोटी. - *दुबार अनुदान वाटप:* अंबड तालुक्यात ९६.८४ लाख, घनसावंगी तालुक्यात ९.०९ कोटी. - *बोगस क्षेत्रवाढ:* अंबड तालुक्यात ८१.३३ लाख, घनसावंगी तालुक्यात ३६.८२ लाख. - *शासकीय जमिनीवर अनुदान:* अंबड तालुक्यात १.८२ लाख, घनसावंगी तालुक्यात १.५७ लाख. - *तलाठ्यांचा सहभाग:* २५ तलाठ्यांकडे १ कोटीपेक्षा जास्त रक्कम आढळली. लोणीकर यांनी स्वतः जिल्हाभर दौरा करून शेतकऱ्यांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे आणि उपमुख्यमंत्र्यांकडे विशेष मागणी करून १५०० कोटींचा निधी मंजूर करून आणला होता. मात्र, तालुका आणि जिल्हा समितीतील अधिकाऱ्यांनी फेरतपासणीची जबाबदारी झटकून हलगर्जीपणा दाखवला, ज्यामुळे खऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित राहावे लागले.

**चौकशी आणि कारवाई**– जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ५४ अधिकाऱ्यांच्या समितीने १,७३,००० शेतकऱ्यांचे रेकॉर्ड तपासले आणि ७२ पानांचा चौकशी अहवाल १० जून २०२५ रोजी सादर केला. यात २०२२ ते २०२५ पर्यंतचे ई-पोर्टल, ८-अ उतारे आणि ऑनलाइन-ऑफलाइन कागदपत्रांचा समावेश आहे. - *वसुली:* अंबड तालुक्यातून ३.२० कोटी आणि घनसावंगी तालुक्यातून २.५४ कोटी, अशा एकूण ५.७४ कोटींची वसुली करून शासनाकडे जमा. - *तलाठ्यांवर कारवाई:* २५ तलाठ्यांना ४८ तासांत खुलासा सादर करण्याच्या नोटिसा; निलंबन प्रस्तावित. - *इतर चौकशी:* तहसीलदार, नायब तहसीलदार, लिपिक आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू. - *विभागीय चौकशी:* विभागीय आयुक्तांनी सर्व जिल्ह्यांत चौकशीचे आदेश दिले; अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे जबाबदारी. - *उर्वरित तालुके:* जालना जिल्ह्यातील इतर सहा तालुक्यांचा अहवाल ३-४ आठवड्यांत अपेक्षित.

**लोणीकर यांचा हल्लाबोल**– ४ जून २०२५ रोजी पत्रकार परिषदेत लोणीकर यांनी तीव्र संताप व्यक्त करत म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या रक्तरंजित निधीवर दरोडा खपवून घेतला जाणार नाही. भ्रष्ट यंत्रणेला उखडून टाकण्यासाठी आम्ही लढा देणार.'' त्यांनी खालील मागण्या केल्या: - दोषी तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबन. - पुराव्यांशी छेडछाड टाळण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती. - दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा. आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना मतदारसंघाचे आमदार अर्जुन खोतकर, बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नारायण कुचे आणि घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिकमत उढान यांच्यासह विधानसभा अधिवेशनात हा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे मांडण्याची घोषणा केली. अर्ध्या तासाच्या चर्चेतून सरकारचे लक्ष वेधून सखोल चौकशी आणि कडक कारवाईची मागणी केली जाईल. जालना जिल्ह्यात अतिवृष्टी आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. यासाठी मंजूर निधीपैकी १०० कोटी रुपये बोगस खात्यांत वळवल्याचा आरोप लोणीकर यांनी यापूर्वी केला होता. २०१४ मध्ये अतिवृष्टीसाठी मंजूर ४१२ कोटींपैकी फक्त ३३० कोटी वाटप झाल्याचे जिल्हाधिकारी पांचाळ यांनी मान्य केले, ज्यावरून अनुदान वितरणातील गैरप्रकारांचा दीर्घकालीन इतिहास दिसतो. ''हा घोटाळा केवळ शेतकऱ्यांवर अन्याय नाही, तर शासनाच्या विश्वासार्हतेवर हल्ला आहे. खऱ्या शेतकऱ्यांना तात्काळ निधी मिळवून देण्यासाठी आणि भ्रष्टाचार्यांना शिक्षा होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही,'' असे लोणीकर यांनी ठणकावले. त्यांनी शेतकऱ्यांना एकजूट होऊन भ्रष्ट यंत्रणेला धडा शिकवण्याचे आवाहन केले. आमदार बबनराव लोणीकर यांनी सरकारला तात्काळ कारवाई करून खऱ्या शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या हक्कासाठी लढण्याचे आणि भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवण्याचे आवाहन त्यांनी केले.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्म योध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**
DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published A√t Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao